ePaper

## “तुमची मस्ती तिकडेच...”, तानाजी सावंतांच्या वक्तव्यावर मनोज जरांगेंचा संताप





| वर्ष - 7 I अंक - 182 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत


- इंग्लंडचा 160 धावांनी विजय!
- मंदान्नाचा डीपफेक व्हिडिओ
- नोटबंदीवरुन पंतप्रधानांवर टीकास्त्र!
- बीएमसीच्या कर्मचाऱ्यांना बोनस!


www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 9 नोव्हेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# कुणबी-मराठा जातप्रमाणपत्रासाठी

# महापालिकेचा स्वतंत्र अधिकारी!

## » आयुक्त शेखर सिंह यांची माहिती : राज्य शासनाच्या निर्देशानुसार कार्यवाही

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा समाजास मराठा-कुणबी, कुणबी- मराठा जात प्रमाणपत्र देण्याबाबत आवश्यक पुरावे शोधण्याच्या अनुषंगाने महापालिकेशी संबंधित अभिलेखांमध्ये उपलब्ध असलेल्या पुराव्यांची वैधानिक आणि प्रशासकीय तपासणी करून दस्तावेजांची पुर्तता करून घेण्यासाठी नोडल अधिकारी नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली आहे.**





याबाबत आयुक्त शेखर सिंह यांनी स्वतंत्र आदेश निर्गमित केला आहे. संपुर्ण महाराष्ट्र राज्यात मराठा समाजातील पात्र व्यक्तींना कुणबी जातीचे जात प्रमाणपत्र देण्यासंदर्भात मराठा समाजातील संबंधित व्यक्तींनी सक्षम प्राधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या पुराव्यांची वैधानिक आणि प्रशासकीय तपासणी कशी करावी, तपासणीअंती कुणबी जातीचे प्रमाणपत्र पात्र व्यक्तींना देण्याबाबतची कार्यपद्धती निश्चित करून अहवाल शासनास सादर करण्याकामी निवृत्त न्यायमुर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे.

राज्य शासनाच्या निर्देशानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने १९४८ ते १९६७ या कालावधीतील जन्म-मृत्यु नोंदी, शैक्षणिक अभिलेख, भूमी अभिलेख, सेवानोंद पुस्तके तसेच महापालिकेतर्फे करण्यात आलेल्या करआकारणी नोंद रजिस्टरमध्ये कुणबी जातीच्या पुराव्यांची वैधानिक व प्रशासकीय तपासणी करून त्याबाबतचा अहवाल शासनाच्या मार्गदर्शक निर्देशांनुसार सादर करण्यासाठी निवडणूक विभागाचे सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

या कामकाजाच्या अनुषंगाने महापालिकेच्या संबंधित विभागांना काही आदेशदेखील देण्यात आले आहेत.

### पुराव्यांची वैधानिक आणि प्रशासकीय तपासणी...

» पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभाग, प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभाग, भूमि व जिंदगी, लेखा विभाग तसेच करआकारणी व करसंकलन विभागाच्या प्रमुखांनी सन १९४८ ते १९६७ या कालावधीमध्ये महापालिकेच्या उपलब्ध अभिलेखांची छाननी करून अभिलेखांमध्ये कुणबी जातीच्या नोंदी असल्याचे आढळून आल्यास अशा पुराव्यांची वैधानिक आणि प्रशासकीय तपासणी केली जाणार आहे. या कामकाजासाठी संबंधित विभागाचे प्रमुख जबाबदार असणार आहेत. या विभागप्रमुखांनी नोडल अधिकाऱ्यांशी समन्वय साधून कामकाज पुर्ण करावे असे आदेशात नमूद केले आहे.

# शिवसेनेत कुणावर अन्याय होणार नाही!

## » खासदार श्रीरंग बारणे : शेकडो कार्यकर्त्यांचा पक्षात प्रवेश

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकार जनहिताचे निर्णय घेत आहे. दिवाळीपूर्वी नागरिकांना आनंदाचा शिधा वाटप केले जात आहे. महिला बचत गटांसाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. मुख्यमंत्री शिंदे यांच्यावर विश्वास ठेवून विविध पक्षातील कार्यकर्ते शिवसेनेत प्रवेश करत आहेत. पक्षात आलेल्या प्रत्येकाला न्याय दिला जाईल. कोणावरही अन्याय होऊ दिला जाणार नाही. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी सरकारच्या योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन शिवसेना उपनेते, खासदार श्रीरंग बारणे यांनी केले.**




पिंपरी-चिंचवड शहर शिवसेना व युवासेना महिला आघाडीच्या सर्व पदाधिकारी यांची आढावा बैठक खासदार बारणे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. आकुर्डीत बुधवारी झालेल्या बैठकीत 250 जणांनी खासदार बारणे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. पदाधिकारी नियुक्ती पत्र वाटप करण्यात आले. 150 महिलासह विविध पदाधिकारी यांना पद वाटप करण्यात आले. जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, प्रमुख मावळ शरद हुलावळे, शहर प्रमुख निलेश तरस, महिला जिल्हा संघटिका शैला पाचपुते, पिंपरी-चिंचवडच्या शहर संघटिका सरिता अरुण साने, मा नगरसेविका विमलताई जगताप चिंचवड विधानसभा महिला संघटिका शारदा वाघमोडे, पिंपरी विधानसभा महिला संघटिका शैला निकम, युवासेना पुणे जिल्हाध्यक्ष विश्वजित बारणे देहू शहर प्रमुख सुनील हगवणे आदी उपस्थित होते.

### संघटन मजबूत करायचे आहे...

»खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, शिवसेनेचे मुख्य नेते, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वार राज्यातील जनतेचा कार्यकर्त्यांच्या मोठा विश्वास आहे. त्यामुळेच विविध पक्षातील लोक शिवसेनेत येत आहे. शहरात शिवसेनेची ताकद वाढत आहे. आमच्यावर विश्वास ठेवून कार्यकर्ते मोठ्या संख्येने शिवसेनेत येत आहेत. पक्षात आलेल्या कोणावरही अन्याय होऊ दिला जाणार नाही. सर्वांना न्याय दिला जाईल. पक्ष संगठना वाढविण्यासाठी कामाला लागा. संघटन मजबूत करायचे आहे. शिवसेना-भाजपचे संघटन वाढीचे काम उत्तमप्रकारे सुरू आहे. आगामी लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने दोन्ही पक्षाचे नियोजनबद्ध काम सुरू आहे. याचा निवडणुकीत मोठा फायदा होईल. राज्य सरकार जनहीताचे विविध निर्णय घेत आहे. सरकारच्या योजनेचा लाभ तळागाळातील जनतेला मिळवून द्यावा, असे आवाहनही खासदार बारणे यांनी केले.

# राज्यातील शिक्षक आता 1967 पूर्वीच्या मराठा कुणबी नोंदींच्या शोधात!

## » सरकारने कुणबी प्रमाणपत्रे देण्यास केली सुरुवात

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**राज्यातील शाळांमध्ये सहामाही परीक्षा संपून दिवाळीच्या सुटीचे वेध लागले असताना आता १९६७ पूर्वीच्या मराठा कुणबी, मराठा विद्यार्थ्यांचे दाखले, नोंदी शोधण्याचे काम शिक्षकांना करावे लागणार आहे. त्यामुळे शिक्षकांना आता शाळेतील जुनी कागदपत्रे, नोंदी काढून शोध घ्यावा लागणार असून, वेळेत काम पूर्ण न झाल्यास दिवाळीच्या सुटीतही शाळेत येऊन काम करावे लागण्याची शक्यता आहे.**




गेल्या काही महिन्यांपासून राज्यात मराठा आरक्षणाचा विषय तापला आहे. राज्य सरकारने कुणबी प्रमाणपत्रे देण्यास सुरुवात केली आहे. तसेच मराठा समाजाला मराठा कुणबी जात प्रमाणपत्र देण्यासाठीची कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने राज्यातील शाळांतील १९६७पूर्वीच्या विद्यार्थ्यांच्या मराठा, मराठा, कुणबी असल्याचे दाखले, नोंदी शोधण्याच्या सूचना सरकारने दिल्या आहेत. त्यात दाखले, नोंदी शोधून स्कॅन करून त्याची माहिती ११ नोव्हेंबरपूर्वी सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे जिल्हा स्तरावर बैठका घेऊन दाखले, नोंदणी शोधण्याचे काम करण्याच्या सूचना राज्यातील शिक्षकांना देण्यात आल्या आहेत. या नोंदी, दाखले शोधण्याची कार्यपद्धतीही ठरवून देण्यात आली आहे. त्यामुळे जवळपास साठ वर्षांपूर्वीच्या विद्यार्थ्यांची कागदपत्रे शोधण्याचे काम आता शिक्षकांना करावे लागणार आहे. तसेच दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास दिवाळीच्या सुटीत बोलावले जाण्याबाबतही स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. शाळांमध्ये सहामाही परीक्षा असतानाही शिक्षकांना ग्रामपंचायत निवडणुकीची कामे करावी लागली. त्यात आता कुणबी नोंदणी शोधण्यासाठी ६० वर्षांपूर्वीची कागदपत्रे तपासण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या कामाचा शिक्षकांवर ताण पडणार आहे. दिवाळीची सुटी लक्षात घेऊन अनेकांनी गावी जाणे, सहलीला जाण्याचे नियोजन केले होते. मात्र, तातडीचे काम आल्याने आता सर्व नियोजन कोलमडणार आहे. तसेच त्यात काही चुका, उणिवा राहिल्यास, विलंब झाल्यास त्याचाही मनस्ताप शिक्षकांनाच सहन करावा लागणार आहे, असे काही शिक्षकांनी सांगितले. मोडी लिपी, सीमा भागात अन्य भाषा येणाऱ्यांची गरज अनेक जुनी कागदपत्रे मोडी लिपीत आहेत. त्यामुळे जुन्या नोंदी शोधण्यासाठी आता मोडी लिपी वाचता येणाऱ्यांची आवश्यकता निर्माण झाली आहे. तसेच सीमेवरील गावांमध्ये त्या भाषा येणाऱ्यांचा शोध घ्यावा लागत आहे.

### प्रमाणपत्र देण्यासाठीची कार्यपद्धती

» मराठा समाजाला मराठा कुणबी जात प्रमाणपत्र देण्यासाठीची कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने राज्यातील शाळांतील १९६७पूर्वीच्या विद्यार्थ्यांच्या मराठा, मराठा, कुणबी असल्याचे दाखले, नोंदी शोधण्याच्या सूचना सरकारने दिल्या आहेत. त्यात दाखले, नोंदी शोधून स्कॅन करून त्याची माहिती ११ नोव्हेंबरपूर्वी सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे जिल्हा स्तरावर बैठका घेऊन दाखले, नोंदणी शोधण्याचे काम करण्याच्या सूचना राज्यातील शिक्षकांना देण्यात आल्या आहेत. या नोंदी, दाखले शोधण्याची कार्यपद्धतीही ठरवून देण्यात आली आहे.

### 60 वर्षांपूर्वीची कागदपत्रे तपासा

» जवळपास साठ वर्षांपूर्वीच्या विद्यार्थ्यांची कागदपत्रे शोधण्याचे काम आता शिक्षकांना करावे लागणार आहे. तसेच दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास दिवाळीच्या सुटीत बोलावले जाण्याबाबतही स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. शाळांमध्ये सहामाही परीक्षा असतानाही शिक्षकांना ग्रामपंचायत निवडणुकीची कामे करावी लागली. त्यात आता कुणबी नोंदणी शोधण्यासाठी ६० वर्षांपूर्वीची कागदपत्रे तपासण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या कामाचा शिक्षकांवर ताण पडणार आहे. दिवाळीची सुटी लक्षात घेऊन अनेकांनी गावी जाणे, सहलीला जाण्याचे नियोजन केले होते. मात्र, तातडीचे काम आल्याने आता सर्व नियोजन कोलमडणार आहे.

# पुणे विद्यापीठातील पीएनआर क्रमांक खुले

## » अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना 25 नोव्हेंबरपर्यंत अर्ज भरण्याची संधी

। पिंपरी । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सत्र पूर्तता संपुष्टात आलेल्या २०१३-१४ वर्षापासूनच्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याची संधी उपलब्ध झाली आहे. संबंधित विद्यार्थ्यांचे कायमस्वरुपी नोंदणी क्रमांक (पीआरएन) मंगळवारपासून खुले झाले आहेत.**




कुठलाही अभ्यासक्रम विशिष्ट कालावधीत पूर्ण करण्याचे बंधन असते. या मुदतीनंतर संबंधित विद्यार्थ्यांचा कायमस्वरुपी नोंदणी क्रमांक कायमस्वरुपी बंद होतो. त्यांना कितीही इच्छा असली तरी परीक्षा देता येत नाही. ही स्थिती लक्षात घेऊन सत्र पूर्तता संपलेल्या विद्यार्थ्यांचे पीआरएन क्रमांक खुले होण्यासाठी कुलगुरु, व्यवस्थापन परिषद आणि परीक्षा विभाग प्रमुखांनी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे (युजीसी) पाठपुरावा केल्यामुळे अशा विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

मंगळवारी सायंकाळी पाचपासून पीआरएन क्रमांक बंद झालेल्या विद्यार्थ्यांना अर्ज भरता येईल. अर्ज भरण्याची लिंक खुली झाली आहे. २५ नोव्हेंबरपर्यंत ही लिंक कार्यान्वित राहील, अशी माहिती विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य सागर वैद्य यांनी दिली.

अभ्यासक्रमाच्या अंतिम किंवा त्याआधीच्या वर्षात अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षेची संधी मिळणार आहे. २०१३ च्या पध्दतीनुसार कला शाखेतील ४१ हजार, वाणिज्य शाखा (पदवी) ३१ हजार २८८, विज्ञान सात हजार ९८६, वाणिज्य शाखा (पदव्युत्तर) २५१५ या व्यतिरिक्त विधी, बीएड असे पुणे, नगर व नाशिक जिल्ह्यातील ९० हजारहून अधिक विद्यार्थी आहेत. संबंधितांना या निर्णयाचा फायदा होणार असल्याचे वैद्य यांनी म्हटले आहे.

### विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याची संधी

» कुठलाही अभ्यासक्रम विशिष्ट कालावधीत पूर्ण करण्याचे बंधन असते. या मुदतीनंतर संबंधित विद्यार्थ्यांचा कायमस्वरुपी नोंदणी क्रमांक कायमस्वरुपी बंद होतो. त्यांना कितीही इच्छा असली तरी परीक्षा देता येत नाही. ही स्थिती लक्षात घेऊन सत्र पूर्तता संपलेल्या विद्यार्थ्यांचे पीआरएन क्रमांक खुले होण्यासाठी कुलगुरु, व्यवस्थापन परिषद आणि परीक्षा विभाग प्रमुखांनी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे (युजीसी) पाठपुरावा केल्यामुळे अशा विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याची संधी उपलब्ध झाली आहे. मंगळवारी सायंकाळी पाचपासून पीआरएन क्रमांक बंद झालेल्या विद्यार्थ्यांना अर्ज भरता येईल. अर्ज भरण्याची लिंक खुली झाली आहे. २५ नोव्हेंबरपर्यंत ही लिंक कार्यान्वित राहील, अशी माहिती विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य सागर वैद्य यांनी दिली.

# विविध मागण्यांसाठी तहसील कार्यालयावर काँग्रेसची धडक!

## कैलास कदम : त्रस्त जनता मोदी सरकारला उलथून टाकेल!

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा काँग्रेसच्या वतीने शहराध्यक्ष डॉ. कैलास कदम यांच्या नेतृत्वाखाली विविध मागण्यांसाठी आज (दि.०८) जन आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले. मोर्चा आकुर्डी चौक ते तहसीलदार कार्यालय निगडी या मार्गावर काढण्यात आला.**




जातीनिहाय जनगणना करून सर्व मागासवर्गीयांना आरक्षण देण्यात यावे, शेतकरी पिक विम्याचे पैसे तत्काळ देण्यात यावे, बेरोजगार युवकांसाठी त्वरित नोकर भरती करण्यात यावी, पेट्रोल डिझेल घरगुती वापराचा गॅस चे दर त्वरित कमी करण्यात यावे, राज्यात सध्या गाजत असलेल्या अमली पदार्थांच्या घटनांवर नियंत्रण करून संबंधितांना कठोर शासन करण्यात यावे या प्रमुख मागण्यांसाठी आज हवालदिल झालेल्या जनतेच्या भावनांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आणि त्यांचा आक्रोश व्यक्त करणाऱ्या जन आक्रोश मोर्चाचे आयोजन काँग्रेसच्या वतीने करण्यात आले.

या मोर्चा दरम्यान तहसीलदार कार्यालयासमोर निषेध सभेचे आयोजन करण्यात आले याप्रसंगी अखिल भारतीय युवक काँग्रेसचे प्रवक्ते गौरव चौधरी, ज्येष्ठ महिला नेत्या शामलाताई सोनवणे, डॉ. कैलास कदम यांनी मनोगते व्यक्त केली. याप्रसंगी माजी महिला प्रदेशाध्यक्षा शामला सोनावणे, शिक्षण मंडळ माजी सभापती अभिमन्यू दहितुले, सेवादल अध्यक्ष विरेंद्र गायकवाड, वरिष्ठ उपाध्यक्ष नरेंद्र बनसोडे, वरिष्ठ उपाध्यक्ष भरत वाल्हेकर, पिंपरी ब्लॉक अध्यक्ष विश्वनाथ जगताप, भोसरी ब्लॉक अध्यक्ष विठ्ठल शिंदे, युवक प्रवक्ता गौरव चौधरी उपस्थित होते.

याप्रसंगी मोदी सरकार आणि राज्यातील तिघाडी सरकार आणि भाजप विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. या मोर्चा दरम्यान मोठ्या प्रमाणात काँग्रेस कार्यकर्ते, पदाधिकारी तसेच सामान्य नागरिकांची उपस्थिती होती. भव्य दिव्य अशा या मोर्चाने वातावरण आणि परिसर दणाणून गेला.

### सरकारच्या धोरणामुळे जनतेचा आक्रोश...

याप्रसंगी बोलताना डॉ. कैलास कदम म्हणाले, "केंद्र सरकारच्या धोरणांमुळे एकंदरीतच कामगार, कष्टकरी, शेतकरी, सर्वसामान्य, नोकरदार, शिक्षक, विद्यार्थी, नागरिक, गृहिणी सर्व हवाल दिल झाले आहेत. प्रचंड महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार वाढवून सोबत ईडी, आयटी, सीबीआय या यंत्रणांचा गैर वापर करत राजकीय सुडाचे राजकारण या भाजपने देशाभरामध्ये सुरू केलेले आहे राज्यातली परिस्थिती पाहता देखील या तिघाडी सरकारच्या माध्यमातून केवळ आश्वासनांचा पाऊस आणि ठोस कृती कार्यक्रम काही नसल्याचे चित्र दिसून येत आहे, एकंदरीतच हवालदिल झालेली जनता आक्रोश करत आहे आणि या आक्रोष्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी आम्ही हा मोर्चा आयोजित केला आहे. त्रस्त झालेली जनता हे सरकार उलथवून टाकल्याशिवाय राहणार नाही"

# आमदार लांडगे यांच्या वाढदिवसाचे 'मेगा सेलिब्रेशन'!

## पंचक्रोशीत 100 + कार्यक्रमांचा 'धुमधडाका' : सांस्कृतिक, धार्मिक अन् सामाजिक उपक्रमांची पर्वणी


। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भोसरी विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त तब्बल १०० हून अधिक सामाजिक उपक्रम अन् सांस्कृतिक कार्यक्रमांचा 'धुमधडाका' होणार आहे. विशेष म्हणजे, पंचक्रोशीतील गावनिहाय आयोजन केल्याचे दिसते. त्यामुळे लांडगे समर्थक व हितचिंतकांनी यंदाचा वाढदिवस 'ग्रँड सेलिब्रेट' करण्याचा संकल्प केल्याचे चित्र आहे.**













कोणताही कार्यक्रम किंवा सामाजिक उपक्रम भव्य-दिव्य साजरा करणारा लोकप्रतिनिधी अशी आमदार महेश लांडगे यांची महाराष्ट्राभरात ओळख आहे. महाराष्ट्रातील सर्वात मोठी इंद्रायणी थडी जत्रा, भारतातील सर्वांत मोठी बैलगाडा शर्यत आणि इंडिया बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डच्या दिशेने वाटचाल करणारी 'रिव्हर सायक्लोथॉन-२०२३' असा गर्दीचा उच्चांक गाठणाऱ्या उपक्रमांमुळे आमदार लांडगे महाराष्ट्रभरात चर्चेत असतात.

लांडगे समर्थक आणि मित्र परिवाराच्या माध्यमातून प्रतिवर्षी त्यांच्या वाढदिवसानिमित्त दि. २७ नोव्हेंबर रोजी अभिष्ठचिंतन सोहळा होतो. २०२१ मध्ये दि. १ नोव्हेंबर ते ३ डिसेंबरपर्यंत असे महिनाभर विविध कार्यक्रमांचे नियोजन केले होते. गतवर्षी आमदार लांडगे यांना मातृशोक झाला. त्यामुळे समर्थकांनी त्यांचा वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय घेतला होता. तत्पूर्वी, कोविड महामारी आणि पश्चिम महाराष्ट्रातील पूरपरिस्थिती आणि कोकणातील निसर्ग चक्रीवादळाच्या संकटामुळे वाढदिवस साजरा करता आला नाही. आता यावर्षी वाढदिवस थाटात साजरा करण्याचा संकल्प आमदार लांडगे समर्थक आणि त्यांच्याशी संबंधित विविध संस्था, संघटनांनी केला आहे.

### सामाजिक बांधिलकी आणि नेत्याप्रति आदरभाव...

सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा आणि सांस्कृतिक यासह आरोग्य विषयक उपक्रमांची महिनाभर रेलचेल राहणार आहे. यावर्षी दिवाळीनंतर दि. १८ नोव्हेंबरपासून ते दि. ९ डिसेंबरपर्यंत २० दिवस भरगच्च कार्यक्रमाचे नियोजन केले आहे. महाराष्ट्रातील प्रसिद्ध कलावंतांना यानिमित्ताने निमंत्रित केले आहे. महान भारतकेसरी, महाराष्ट्र केसरी अशा बैलागाडा शर्यती चाकण-राजगुरूनगर परिसरात होणार आहेत. यासोबतच महाराष्ट्रातील सर्वांत मोठे अश्व व देशी गोवंश पशू प्रदर्शनही मोशीत होणार आहे. पर्यावरण व इंद्रायणी नदी संवर्धनाचा संदेश देण्यासाठी 'वर्ल्ड रेकॉर्ड'कडे वाटचाल करणारी 'रिव्हर सायक्लोथॉन-२०२३', जॉय स्ट्रिट- २०२३, सोसायटीधारकांसाठी क्रिकेट स्पर्धा, महिलांसाठी खेळ रंगला पैठणीचा, मोफत बाल जत्रा, भीमाशंकर-ओझर-लेण्याद्री देवदर्शन, मुलांसाठी विविध स्पर्धा, हास्यजत्रा अशा विविध कार्यक्रम निगडी, तळवडे, चिखली, जाधववाडी, मोशी, डुडूळगाव, चऱ्होली, दिघी, भोसरी, नेहरुनगर या सोबतच जिल्ह्याच्या ग्रामीण भागात विविध कार्यक्रम होणार आहेत. सामाजिक बांधिलकी आणि नेत्याप्रति असलेला आदरभाव यामुळेच एव्हढ्या मोठ्या प्रमाणात वाढदिवसाचे 'सेलिब्रेशन' होते आहे, असा दावा लांडगे समर्थकांकडून केला जात आहे.




**२०२३ च्या पहिल्या सहामाहीत भारतामध्ये मुसलमानांना लक्ष्य करणाऱ्या द्वेषपूर्ण भाषणांच्या (हेट स्पीचेस) २५५ घटना नोंदवल्या गेल्या. म्हणजे दर महिन्याला ४२ आणि दर दिवसाला जवळपास १.५ द्वेषपूर्ण भाषणं! यापैकी ३३ टक्के भाषणांमध्ये मुसलमानांच्या विरोधात हिंसा करण्यासंबंधीचा थेट उल्लेख होता. जवळपास १२ टक्के भाषणांमध्ये त्यांच्या विरोधात शस्त्रं उचलण्याचं आवाहन होतं.**

# हीच तर पत्रकारितेशी बांधिलकी!



यापैकी ८० टक्के भाषणं ही भाजपशासित राज्यांमध्ये किंवा केंद्रशासित प्रदेशांमध्ये झाली होती, ज्यात आश्चर्य वाटण्यासारखं काहीच नाही. यात आश्चर्य वाटण्यासारखी एक गोष्ट मात्र आहे. अशा द्वेषपूर्ण भाषणांच्या सर्वाधिक, म्हणजे २९ टक्के घटना महाराष्ट्रामध्ये घडलेल्या आहेत. शाहू- फुले- आंबेडकरांचा वारसा सांगणाऱ्या, स्वत:ला पुरोगामी म्हणवणाऱ्या या राज्याने या वर्षाचा बहुतेक काळ हा मुसलमानांचं खच्चीकरण करण्यासाठी आवाज उठवण्यात घालवलाय. ही महत्त्वाची आकडेवारी प्रसिद्ध केलीये संशोधनकार्य करणाऱ्या 'हिंदुत्व वॉच' नावाच्या संस्थेने. भारतातल्या धार्मिक अल्पसंख्याकांच्या विरोधात होणारी द्वेषपूर्ण भाषणं आणि गुन्हे यांची नोंद घेण्याच्या उद्देशाने त्यांनी ही पाहणी केली होती. या संस्थेचे संस्थापक आहेत २८ वर्षांचे रकीब नाईक. हा काश्मिरी पत्रकार वॉशिंग्टन डीसी येथे राहतो. त्याची १२ जणांची टीम आहे. ही सर्व स्वत:हून देश सोडून अमेरिका, कॅनडा आणि युरोपात स्थायिक झालेली तरुण मुलं आहेत.

गेल्या १९ महिन्यांमध्ये 'हिंदूत्व वॉच'ने १२०० हून अधिक व्हिडिओ जमा केलेले आहेत. यात अल्पसंख्याकांच्या विरोधात घडलेले गुन्हे, द्वेषपूर्ण भाषणं यांचा समावेश आहे. आणि या व्हिडिओंना लाखांमध्ये व्ह्यूज मिळालेले आहेत. त्यांच्या या कामाचं महत्त्व हे की, काही काळापूर्वी या माहितीच्या आधारे सर्वोच्च न्यायालयात अर्ज करण्यात आला आणि भारतामध्ये द्वेषपूर्ण भाषणांचा जो महापूर आलाय त्यामध्ये न्यायालयाने लक्ष घालावं अशी विनंती करण्यात आली. या वर्षीच्या ऑगस्ट महिन्यात हरयाणाच्या नुह जिल्ह्यात धार्मिक हिंसाचाराचा उद्रेक झाला होता. यात सहा माणसं मारली गेली. बहुतेक प्रसारमाध्यमांनी या घटनेचं वार्तांकन करताना, 'दोन जमातींमधला संघर्ष,' असं त्याचं वर्णन केलेलं असलं, तरी 'हिंदुत्व वॉच'ने यामागचं कटू सत्य समोर आणलं. हा हिंसाचार सुरू होण्याच्या काही तास आधी विश्व हिंदू परिषदेचे नेते सुरेंद्र जैन यांनी नुहच्या मेवात शहरात मुसलमानांच्या विरोधात एक भाषण केलेलं होतं. त्याच्यासमोर बसलेल्या शेकडो लोकांना त्याने, 'आपण मेवातचा चेहरामोहरा बदलायला हवा,' असं जाहीर आवाहन केलं होतं. दंगलीमागे असलेली ही चिथावणी इतर कोणत्याही प्रसारमाध्यमाला प्रस्थापित करता आलेली नव्हती. 'अल्पसंख्याकांच्या विरोधातल्या सगळ्या गुन्ह्यांची एकत्रित नोंद घेतली जाईल असं एक व्यासपीठ मला स्थापन करायचं होतं,' रकीबने मला सांगितलं. वॉशिंग्टन डीसीहून फोनवर तो माझ्याशी बोलत होता. 'भारतामध्ये हिंदूराष्ट्रप्रेमाची जी भरती आलेली आहे त्याविषयी जाणून घेण्यात कोणाला रस असेल, तर ते सगळं एकाच ठिकाणी उपलब्ध असायला हवं असं मला वाटत होतं.' टोकाची उजवी विचारसरणी असलेल्या भारतामधल्या नेत्यांच्या सोशल मीडिया अकाऊंटवर लक्ष ठेवणं ही रकीब आणि त्याच्या टीमच्या कामाची सुरुवात होती. हे नेते देशभर फिरतात, द्वेषपूर्ण भाषणं करतात आणि ही भाषणं आपल्या सोशल मीडियाच्या व्यासपीठांवर अपलोडही करतात. रकीब सांगतो, 'हे नेते आपल्या सोशल मीडियामधून त्यांच्या विचारांच्या लोकांशी संवाद साधत असतात. त्यांना उचकावत असतात. भारताला हिंदूराष्ट्र बनवण्याचं हे काम अखंडपणे, अव्याहत चालू आहे.' सोशल मीडियाचा अल्गोरिदम असा आहे की, अशा प्रकारच्या माहितीमध्ये रस नसलेल्या बहुसंख्य लोकांना ही द्वेषपूर्ण भाषणं होताहेत याची खबरही लागत नाही. म्हणूनच 'हिंदुत्व वॉच'ला महत्त्व आहे. उजवी विचारसरणी नसलेल्या लोकांना भारतामध्ये काय घडतंय याची जाणीव ते करून देताहेत. अशा प्रकारचा प्रयत्न भारतामध्ये याआधीही झालेला आहे. पण तो करणाऱ्यांना आपलं काम सरकारी दबावापोटी थांबवावं लागलं असं म्हटलं जातं. त्या प्रकाशनांच्या संपादकांनी त्यानंतर आपल्या पदांचा राजीनामा दिला.

## संपादकीय »


# बायडेन बुडवणार!

***पॅलेस्टाईनमध्ये इस्रायली करत असलेल्या अमानुष हत्याकांडाचे कोणासही सोयरसुतक नाही. तथापि याचे गंभीर जागतिक परिणाम संभवतात..***

इंग्रजीत 'बुल इन चायना शॉप' असा वाक्प्रचार आहे. कपबशा, काचेची भांडी इत्यादी असलेल्या दुकानात मस्तवाल बैल घुसल्यास काय होईल हे या वाक्प्रचारातून सूचित होते. गाझा परिसरात गेले महिनाभर इस्रायली फौजा जो हैदोस घालत आहेत तो पाहिल्यावर आणि मुख्यत: त्या फौजांचे सूत्रधार इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांचे या काळातील वर्तन पाहिल्यावर या वाक्प्रचाराची आठवण होते. या इस्रायली 'बैलास' घुसण्याची संधी 'हमास'ने दिली हे मान्य. 'हमास'ने पहिला हल्ला केला त्यामुळे त्याचा प्रतिशोध घेण्याचे कारण इस्रायलला मिळाले हेही खरे. पण असा सूड उगवताना देशप्रमुखाने गावगुंडासारखे वागायचे नसते आणि तसे कोणाचे वर्तन होत असेल तर अन्य शहाण्यांनी हे बेभान सूडनाट्य थांबवायचे असते, हे या सगळ्यांहून खरे. आज हमास आणि इस्रायल यांतील संघर्षास एक महिना झाला.

**कोणत्याही स्पर्धा परीक्षांचा निकाल जाहीर झाल्यावर गुणवत्ता यादीतील पहिले काही विद्यार्थी आमच्याच संस्थेचे अशी जाहिरात एकाच वेळी अनेक 'कोचिंग क्लासेस' करतात; त्यातून गुणवान विद्यार्थी नक्की कोणत्या संस्थेचे याचे कोडे काही सुटत नाही.. राज्यातील २३०० पेक्षा अधिक ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचा निकाल जाहीर झाल्यावर सर्वच राजकीय पक्षांनी यश आमचेच हा दावा करण्यास सुरुवात केली.**

# गावे आम्हीच जिंकल्याचे दावे!



भाजप आणि काँग्रेस या दोघांनीही ७०० पेक्षा अधिक जागा जिंकल्याची आकडेवारी सादर केली. सत्ताधारी महायुतीने १४००पेक्षा अधिक ग्रामपंचायती जिंकल्याचा दावा केला तर महाविकास आघाडीने १३०० पेक्षा अधिक ग्रामपंचायतींमध्ये सत्ता आल्याचे जाहीर केले. ग्रामपंचायती २३०० आणि महायुती आणि महाविकास आघाडीने विजयाचा दावा केलेला आकडा मिळून २७००! यावरूनच नक्की कोणाचे खरे, हा प्रश्न उपस्थित होतो. ग्रामपंचायतींच्या निवडणुका या पक्षीय पातळीवर लढविल्या जात नाहीत.

राजकीय पक्ष स्थानिक पातळीवर पॅनेलच्या माध्यमातून रिंगणात उतरतात. राजकारणी आपापल्या प्रभाव क्षेत्रांत आपल्या समर्थकांना सारी 'ताकद' देतात. भाजप वा काँग्रेस किंवा अन्य पक्षाच्या नेत्यांची पॅनेल्स निवडून आली तरी त्यांची नोंद राजकीय पक्ष म्हणून होत नाही. कारण उमेदवारी अर्ज भरताना राजकीय पक्षाचे उमेदवार म्हणून नोंद नसते. परिणामी निवडून येणारे सारेच अपक्ष म्हणून गणले जातात. तरीही भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादीचा अजित पवार गट किंवा शिवसेनेच्या शिंदे गटाने आपल्यालाच यश मिळाल्याचा दावा केला. राजकीय पक्षांनी विजयाचे दावे करणे समजू शकते पण विविध वृत्तवाहिन्यांनी जणू काही लोकसभा अथवा विधानसभा निवडणुकांच्या निकालांच्या धर्तीवर कोणत्या पक्षांनी किती ग्रामपंचायती जिंकल्या याची आकडेवारी दिवसभर दाखवून बातमीदारीपेक्षा त्या मनोरंजनच कसे अधिक करतात, हे दाखवून दिले. ग्रामपंचायतींच्या निवडणुका पक्षविरहित लढविल्या जाव्यात, अशी तरतूद कायद्यात असल्याने या निवडणुकांत राष्ट्रीय किंवा राज्य पातळीवरील नोंदणीकृत राजकीय पक्षांच्या चिन्हांचा वापर करता येत नाही. समजा, एखाद्या उमेदवाराने कमळ किंवा हाताच्या पंजाच्या चिन्हाची मागणी केली तरी त्याला ते मिळू शकत नाही. ग्रामपंचायतींमध्ये मुक्त निवडणूक चिन्हांचाच वापर केला जातो. पी. व्ही. नरसिंहराव यांच्या पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार पंचायतींना जादा अधिकार बहाल करण्यात आले. त्यामुळेच ग्रामपंचायतींच्या निवडणुका देशभर पक्षाच्या चिन्हांवर लढविल्या जात नाहीत, पण यातून ग्रामपंचायतींच्या निवडणुका पार पडल्यावर सत्ताधारी आणि विरोधकांकडून सर्वाधिक जागा जिंकल्याचा दावा करण्याचे प्रकार सर्वच राज्यांत घडतात.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# बीएमसीच्या कर्मचाऱ्यांना बोनस!

## » कर्मचाऱ्यांना 26 हजार रुपये बोनस केला जाहीर

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुंबई महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना यावर्षी २६ हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे केली. गतवर्षीच्या तुलनेत ३५०० रुपयांची वाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला. वर्षा निवासस्थानी यासंदर्भात मुंबई महापालिकेच्या सर्व कामगार, कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक झाली. त्यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हा निर्णय जाहीर केला.**



दिवाळीचा सण अगदी तोंडावर आला आहे. देशात सर्वत्र नागरिकांकडून दिवाळीची जोरदार तयारी केली जात आहे. पण मुंबई महापालिका आणि 'बेस्ट'चे कर्मचारी अद्याप बोनसची वाट पाहत आहेत. गेल्या कित्येक वर्षात पहिल्यांदाच बीएमसी आणि बेस्टच्या कर्मचाऱ्यांना बोनस मिळाला नाही. तसेच बोनस मिळणार की नाही? याबाबतही संभ्रम आहे. यावरून ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी राज्य सरकारवर टीकास्र सोडलं आहे. तसेच त्यांनी मुंबई महापालिकेच्या आयुक्तांना महत्त्वाचा प्रश्न विचारला आहे. त्यांनी 'एक्स'वर (पूर्वीचे ट्विटर) पोस्ट लिहून सरकारला लक्ष्य केलं आहे. बुधवारी (आज) दुपारीच शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी ट्विट करून दिवाळी बोनसवरून मुख्यमंत्र्यांना सवाल केला होता. त्यानंतर काही तासांतच मुख्यमंत्र्यांनी दिवाळी बोनस देण्याची घोषणा केली. दिवाळी अगदी तोंडावर आलेली असताना मुंबई महापालिका आणि बेस्टचे कर्मचारी अद्याप बोनसची वाट पाहत होते. कित्येक वर्षात पहिल्यांदाच बीएमसी आणि बेस्टच्या कर्मचाऱ्यांना बोनस मिळणार की नाही? याबाबत संभ्रम होता. परंतु मुख्यमंत्र्यांनी सर्व कामगार, कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींच्या बैठकीनंतर सानुग्रह अनुदान देण्याची घोषणा केली. गेल्या वर्षी दिवाळी सानुग्रह अनुदान देताना पहिल्यांदाच २५०० ने वाढ करण्यात आली होती. यावर्षी त्यात वाढ करून २६ हजार रुपयांचे सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय मुख्यमंत्र्यांनी घेतला.

यावेळी रोजंदारीवर काम करणाऱ्या बहुउद्देशीय कामगारांना देखील सानुग्रह अनुदान देण्याची मागणी केली त्यावर रुग्णालय बहुउद्देशीय कामगार आणि बालवाडी शिक्षिकांना दिवाळी भेट देण्यासंदर्भात महापालिका आयुक्तांना निर्देश दिले. मुंबई महापालिका कर्मचाऱ्यांना लागू असलेली गट विमा योजना २०१७ पासून बंद होती. ती पुन्हा सुरू करण्याचे निर्देश देतानाच त्यात वाढ करून पाच लाखापर्यंतची गट विमा योजना पुन्हा सुरू करण्याचा निर्णय आणि ही योजना जानेवारी २०२४ पासून लागू करण्याबाबत प्रशासनाला मुख्यमंत्री शिंदे यांनी निर्देश दिले. आशा सेविका यांना एक महिन्याचे वेतन सानुग्रह अनुदान देण्याबाबतही याबैठकीत निर्णय घेण्यात आला. सफाई कामगारांच्या मुलांना उच्च शिक्षणाची संधी प्राप्त व्हावी यासाठी शिष्यवृत्ती देण्याची देखील कार्यवाही करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. माझा बीएमसी महापालिका आयुक्तांना एक महत्त्वाचा प्रश्न... अनेक दशकांनतर पहिल्यांदाच मुंबई महापालिका आणि 'बेस्ट'च्या कर्मचाऱ्यांना त्यांचा दिवाळी बोनस अद्याप मिळालेला नाही. मुख्यमंत्री कार्यालयाच्या माध्यमातून बीएमसी चालवणारे खोके सरकार (लोकप्रतिनिधींच्या अनुपस्थितीत) दिवाळी बोनस देणार आहे की नाही? देणार असेल, तर कधी? दिवाळी संपल्यावर?", असा सवाल आदित्य ठाकरे यांनी ट्विट करून विचारला होता.

### बीएमसी चालवणारे खोके सरकार

» एक्स'वर लिहिलेल्या पोस्टमध्ये आदित्य ठाकरे म्हणाले, "माझा बीएमसी महापालिका आयुक्तांना एक महत्त्वाचा प्रश्न... अनेक दशकांनंतर पहिल्यांदाच मुंबई महापालिका आणि 'बेस्ट'च्या कर्मचाऱ्यांना त्यांचा दिवाळी बोनस अद्याप मिळालेला नाही. मुख्यमंत्री कार्यालयाच्या माध्यमातून बीएमसी चालवणारे खोके सरकार (लोकप्रतिनिधींच्या अनुपस्थितीत) दिवाळी बोनस देणार आहे की नाही? देणार असेल, तर कधी? दिवाळी संपल्यावर?" "जनतेच्या माहितीसाठी आणखी एक विषय आहे. रस्ते घोटाळ्यातील कंत्राटदाराला बडतर्फ करण्याची फाइल अंतिम स्वाक्षरीसाठी महापालिका आयुक्तांच्या डेस्कवर पोहोचली आहे.

# आरक्षण कधी मिळेल सांगायला पंचांग घेऊन बसलो नाही!

## » सुप्रीम कोर्टात आरक्षण का टिकलं नाही : तानाजी सावंत

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मनोज जारांगे पाटील यांच्या उपोषणानंतर मराठा आरक्षणाचा मुद्दा राज्यात चांगलाच ऐरणीवर आला. मराठा आरक्षण आंदोलनाच्या काळात राजकीय नेत्यांना गावबंदीचे निर्णय देखील घेण्यात आले. काही नेत्यांची घर जळाली तर काही नेत्यांची कार्यालय फोडली गेली. सध्या मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला २४ डिसेंबरपर्यंतची मुदत दिली आहे.**

राज्याचे आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी भैरवनाथ उद्योग समुहातर्फे आरक्षणासाठी बलिदान देणाऱ्या तरुणांच्या कुटुंबांना पाच लाख रुपयांची मदत जाहीर करण्यात आली. मात्र, तानाजी सावंत यांनी यावेळी आरक्षणाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर का आला ? देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना त्यानी दिलेले मराठा आरक्षण तत्कालीन सरकार सुप्रीम कोर्टात का टिकवू शकलं नाही ? असे प्रश्न उपस्थित केले. मराठा आरक्षण आंदोलना दरम्यान आत्महत्या केलेल्या तरुणांना मदतीचा हात म्हणून भैरवनाथ उद्योग समुहाच्या वतीने ४५ कुटूंबांना प्रत्येकी ५ लाखांची मदत करण्यात येणार, असल्याची माहिती दिली. मराठा



बांधवांनी आत्महत्या करू नये अशी विनंती तानाजी सावंत यांनी केली. तानाजी सावंत म्हणाले की, पाहिलं आरक्षण मिळालं असताना ते रद्द झालं ते रद्द झाल्यानंतर वर्ष दोन वर्षे कोणी काही बोल नाही. आणि अचानक वादळ यावं तास आंदोलन कोण करतय? का करतय ? हे समजून घेण्यापेक्षा मराठी कुटुंबांना मदत करणं महत्वाचं आहे. आरक्षण मिळेल नाही मिळेल हा पुढचा भाग, पण ही मागणी अचानक का सुरू झाली हा ही प्रश्न आहेच, असं ते म्हणाले. २०१४ साली उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री असताना राज्यात मराठ्यांना आरक्षण दिलं होतं. त्यानंतर या आरक्षणाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले गेलं आणि तत्कालीन सरकारने योग्य भूमिका मांडली नाही? त्यांना आरक्षण का टिकवता आलं नाही असं थेट सवाल तानाजी सावंत यांनी या पत्रकार परिषदेमध्ये केला आहे. आरक्षण कधी मिळेल हे सांगायला मी काही पंचांग घेऊन बसलो नाही, हा लढा आहे. काही बाबी कायदेशीर आहेत, असं तानाजी सावंत म्हणाले. आज एका पद्धतीने शासनाची दमछाक करून आताच्या आताच आरक्षण द्या, कागदावर लिहून द्या अशी भूमिका घेतली जात आहे. पण आरक्षण टिकलं पाहिजे ते महत्वाचं आहे, असंही ते म्हणाले. या मुद्यावरुन मनोज जरांगे पाटील यांनी तानाजी सावंत यांना प्रत्युत्तर दिलं आहे.

### तुमची मस्ती तिकडेच...

» शिंदे गटाचे मंत्री तानाजी सावंत यांनी मराठा आरक्षणाच्या मागणीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. मराठा आरक्षणाचं वादळ अचानक कसं आलं? असा सवाल तानाजी सावंत यांनी विचारला आहे. तसेच शासनाची दमछाक करून आताच आरक्षण द्या, कागदावर लिहून द्या, अशी भूमिका घेतली जात आहे, अशा शब्दांत तानाजी सावंतांनी अप्रत्यक्ष टीका केली आहे.

# त्यांना शरम वाटत नाही!

## » पंतप्रधान मोदींची नितीश कुमारांवर टीका

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी मंगळवारी (७ नोव्हेंबर) विधानसभेत लोकसंख्या नियंत्रणावर बोलत असताना मुलींच्या शिक्षणाची आवश्यकता अधोरेखित केली. यावेळी त्यांनी एक विचित्र टिप्पणी केली. ज्यामुळे सभागृहात उपस्थित असलेल्या महिला आमदार खाजिल झाल्या, तर पुरुष आमदारांमध्ये कुजबुज सुरू झाली. नितीश कुमार यांच्या विचित्र वक्तव्यामुळे विरोधी पक्षांनी त्यांच्यावर टीकेची झोड उठवली आहे.**

नितीश कुमार म्हणाले, "पुरुष रोज रात्री पत्नीशी संबंध निर्माण करतात. यामुळे मूल जन्माला येते. परंतु, मुली साक्षर असतील तर प्रजनन दर घसरतो. मुलगी सुशिक्षित असेल तर प्रजनन दर सरासरी दोन टक्क्यांपर्यंत खाली येतो आणि जर तिने शालेय शिक्षण पूर्ण केले असेल तर प्रजनन दर राष्ट्रीय स्तरावर १.७ टक्क्यांपर्यंत खाली येतो. नितीश कुमार पुढे लैंगिक शिक्षणावरही बोलले. लैंगिक शिक्षणावर बोलताना त्यांनी प्रजनन दर कसा कमी होतो यावरही भाष्य केलं. परंतु, ते वक्तव्य किळसवाणं होतं, असा आरोप विरोधक करत आहेत. या वक्तव्यानंतर नितीश कुमार यांच्यावर विरोधक टीका करत असतानाच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीदेखील यावर भाष्य केलं आहे. त्यांनी नितीश कुमार यांचं नाव न घेता इंडिया आघाडीवर टीका केली आहे. पंतप्रधान बुधवारी (८ नोव्हेंबर) मध्य प्रदेशमध्ये भाजपाच्या प्रचारसभेत बोलत होते. यावेळी पंतप्रधान मोदी म्हणाले, इंडी अलायन्सचे



लोक सध्या भारतातलं विद्यमान सरकार पाडण्याचा प्रयत्न करत आहेत. सरकार पाडण्याच्या गप्पा मारत आहेत. त्यांच्यातला एक नेता जो इंडी अलायन्सचा झेंडा घेऊन फिरतोय, त्याने काल माता-भगिनींबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केलं. त्या नेत्याने भर विधानसभेत, जिथे माता-भगिनीही उपस्थित होत्या, तिथेच घाणेरडं वक्तव्य केलं. नरेंद्र मोदी म्हणाले, कोणी कल्पना करणार नाही, अशा पद्धतीचं ते वक्तव्य होतं. त्यांना कसलीच शरम नाही. हा सगळा प्रकार एवढ्यावरच थांबला नाही. त्या नेत्याच्या वक्तव्यानंतर त्यांच्या आघाडीतला एकही नेता माता-भगिनींबाबतच्या आक्षेपार्ह वक्तव्याविरोधात, त्यांच्या भयंकर अपमानाविरोधात एक शब्द बोलण्यास तयार नाही. जे लोक माता-भगिनींप्रती असा विचार करत असतील ते तुमचं काय भलं करणार? हे लोक तुमची आब्रू वाचवू शकतात का? तुमचा सन्मान करू शकतात का? आपल्या देशाचं किती मोठं दुर्दैव आहे बघा. पंतप्रधान म्हणाले, तुम्ही (इंडिया आघाडी) अजून किती खाली जाणार आहात? जगभरात आपल्या देशाला अजून किती अपमानित करणार आहात? मी आज देशातल्या सर्व माता-भगिनींना सांगतो की तुमच्यासाठी, तुमच्या सन्मानासाठी माझ्याकडून शक्य होईल ते सगळं मी करेन. मी मागे हटणार नाही.

### लैंगिक शिक्षणावर बोलले नितीश

» "पुरुष रोज रात्री पत्नीशी संबंध निर्माण करतात. यामुळे मूल जन्माला येते. परंतु, मुली साक्षर असतील तर प्रजनन दर घसरतो. मुलगी सुशिक्षित असेल तर प्रजनन दर सरासरी दोन टक्क्यांपर्यंत खाली येतो आणि जर तिने शालेय शिक्षण पूर्ण केले असेल तर प्रजनन दर राष्ट्रीय स्तरावर १.७ टक्क्यांपर्यंत खाली येतो. नितीश कुमार पुढे लैंगिक शिक्षणावरही बोलले. लैंगिक शिक्षणावर बोलताना त्यांनी प्रजनन दर कसा कमी होतो यावरही भाष्य केलं. परंतु, ते वक्तव्य किळसवाणं होतं, असा आरोप विरोधक करत आहेत. या वक्तव्यानंतर नितीश कुमार यांच्यावर विरोधक टीका करत असतानाच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीदेखील यावर भाष्य केलं आहे. त्यांनी नितीश कुमार यांचं नाव न घेता इंडिया आघाडीवर टीका केली आहे. पंतप्रधान बुधवारी (८ नोव्हेंबर) मध्य प्रदेशमध्ये भाजपाच्या प्रचारसभेत बोलत होते. यावेळी पंतप्रधान मोदी म्हणाले, इंडी अलायन्सचे लोक सध्या भारतातलं विद्यमान सरकार पाडण्याचा प्रयत्न करत आहेत. सरकार पाडण्याच्या गप्पा मारत आहेत.

# नोटबंदीवरुन पंतप्रधानांवर टीकास्त्र!

## » जनता मोदींना माफ करणार नाही : काँग्रेस

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**नोटबंदी करून देशातील जनतेला जो त्रास झाला, त्यासाठी देशातील जनता पंतप्रधान मोदींना कधीही माफ करणार नाही, अशी टीका काँग्रेसच्या वतीने करण्यात आली आहे. एका विशिष्ट व्यक्तीला श्रीमंतांच्या यादीत जगातील दुसऱ्या क्रमांकाचा श्रीमंत व्यक्ती बनवण्यासाठी हे सगळे प्रयत्न होते, असा गंभीर आरोप काँग्रेस नेते राहुल गांधींनी केला. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, महासचिव जयराम रमेश यांनीही नोटबंदीवरुन पंतप्रधानांवर टीकेची झोड उठवली.**

श्रीमंत लोकांना नोटा बदलण्यासाठी रांगेत उभे राहावे लागले नाही. मात्र, सर्वसामान्य गरीब लोकांना रांगेत उभे केले गेले. जीएसटीने भारतातील छोटे व्यापारी संपवले. नोटबंदीमुळे २०११ नंतर जीडीपीची वाढ थांबली. नोटबंदी हा एम समजून रचलेला कट होता.



### दोन हजारची नोट चलनातून हटवली

» पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ८ नोव्हेंबर २०१६ ला रात्री आठच्या सुमारास नोटबंदीची घोषणा केली होती. या घोषणेसह जुन्या अस्तित्वात असलेल्या पाचशे आणि हजार रुपयांच्या नोटा बंद करत पाचशे आणि दोन हजार रुपयांच्या नव्या नोटा चलनात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले होते. आता मात्र दोन हजार रुपयांची नोट देखील चलनातून हटवली गेली.

देशातील नोकऱ्या घालवणे, कामगारांचे वेतन थांबवणे, लहान व्यापाऱ्यांना संपवणे हे काम नोटबंदीच्या माध्यमातून झाले. नोटबंदीमुळे शेतकऱ्यांना मोठे नुकसान सहन करावे लागले. १ % लोकांना फायदा मिळवून देण्यासाठी असंघटित क्षेत्रासह देशातील ९९% जनतेवर हा मोठा आघात होता. जनतेचे खिसे कापून आपल्या लोकांचे खिसे भरण्याचा प्रयत्न होता.

एका विशिष्ट व्यक्तीला श्रीमंतांच्या यादीत जगातील दुसऱ्या क्रमांकाचा श्रीमंत व्यक्ती बनवण्यासाठी हे सगळे प्रयत्न होते, असा आरोप करत राहुल गांधींनी नोटबंदीच्या मुद्द्यावरून पंतप्रधानांवर टीका केली आहे. नोटबंदीच्या मुद्द्यावरून काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी पंतप्रधानांवर नरेंद्र मोदींवर टीका केली. नोटबंदीनंतर पंतप्रधान मोदींनी ५० दिवस मागितले होते, आज ७ वर्ष झाले. यामध्ये श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहेत तर गरीब अधिक गरीब होत आहेत. नोटबंदीमुळे अनेक लोकांच्या नोकऱ्या गेल्या, देशाच्या अर्थव्यवस्थेला धक्का बसला.

# मोदींसह भाजपाला गाडण्याची वेळ आलीये!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

सात वर्षांपूर्वी आजच्याच दिवशी (८ नोव्हेंबर २०१६) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नोटबंदीची घोषणा केली आहे. भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी आपण नोटबंदीचा निर्णय घेतल्याचं मोदींनी आपल्या भाषणात सांगितलं. तसेच मला केवळ ५० दिवस द्या, ५० दिवसांत देश भ्रष्टाचारमुक्त झाला नाही, तर मला जिवंत जाळा, अशा आशयाचं वक्तव्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं होतं. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या या वक्तव्याला आणि नोटबंदीच्या निर्णयाला आज बरोबर सात वर्षे पूर्ण झाली आहेत.

याच पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाचे वकील आणि सामाजिक कार्यकर्ते प्रशांत भूषण यांनी तिखट शब्दांत प्रतिक्रिया दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपाला आता गाडण्याची वेळ आली आहे, अशी टीका प्रशांत भूषण यांनी केली. त्यांनी आपल्या 'एक्स' (पूर्वीचे ट्विटर) खात्यावर एका जुन्या बातमीचा स्क्रीनशॉट शेअर करत मोदींना लक्ष्य केलं आहे. "मला ५० दिवस द्या, मी चुकीचा निघालो, तर मला जाळून टाका" असा मथळा असलेल्या बातमीचा स्क्रीनशॉट शेअर करत प्रशांत भूषण आपल्या पोस्टमध्ये म्हणाले, "नोटाबंदीला आज ७ वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यांनी (नरेंद्र मोदी) ५० दिवसांची मुदत मागितली होती. पण आता त्यांना आणि भाजपाला गाडण्याची वेळ आली आहे." प्रशांत भूषण यांनी अन्य एक पोस्ट करत भाजपा समर्थक कार्यकर्त्यांचे कान टोचले आहेत. तसेच नोटबंदीचा निर्णय घेतल्यामुळे निराश झालेल्या लोकांची मोदींनी कशी खिल्ली उडवली, हे कधीही विसरू नका, असा सल्लाही भूषण यांनी दिला. यावेळी त्यांनी नरेंद्र मोदींच्या जुन्या भाषणाचा व्हिडीओही शेअर केला आहे.

# स्वराला आठवतेय बॉलीवूडची दिवाळी पार्टी!



सध्या सर्वत्र दिवाळी सणाचा उत्साह दिसत आहे. अशा परिस्थितीत बॉलिवूडमधील सेलिब्रिटींना देखील दिवाळीचे वेध लागले आहेत. तर दुसरीकडे सेलिब्रिटीच्या घरी दिवाळी पार्टी सुरु झाली आहे. मनीष मल्होत्राने याची सुरुवात केली आता रमेश तौरानीनेही त्याच्या घरी दिवाळीची पार्टी आयोजित केली होती. जिथे सर्व बॉलीवूड स्टार्सनी हजेरी लावली. मात्र या सर्वात एक अभिनेत्री गैरहजर राहिली ती म्हणजे बॉलिवूड अभिनेत्री स्वरा भास्कर. स्वरा भास्कर यंदाच्या दिवाळी पार्टीला मिस करत आहे. त्यामागे कारणही तसेच आहे. स्वराने या वर्षी सप्टेंबरमध्ये मुलीला जन्म दिला आहे. मुलीची काळजी घेण्यात व्यस्त असल्याने ती यंदाच्या दिवाळी पार्टीला जाऊ शकत नाही. त्यामुळे सध्या सोशल मिडियावर दिवाळी पार्टीचे फोटो व्हायरल झाल्यानंतर स्वरा दिवाळी पार्टीना मिस करत आहे. स्वरा भास्करने सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर केला आहे. ज्यामध्ये तिने तिच्या जुन्या दिवाळी पार्टी लूकचे काही फोटो शेअर केले आहेत. या व्हिडिओच्या सुरुवातीला ती तिच्या पायजमामध्ये मुलगी राबियाची काळजी घेताना दिसत आहे तर त्यानंतर तिचे मागील वर्षाचे काही दिवाळी लूक दाखवण्यात आले आहेत. हा व्हिडिओ शेअर करत स्वराने लिहिले की, मला दिवाळीच्या काळात FOMO होत आहे. यासोबतच स्वराने व्हिडीओमध्ये लिहिले, "आई झाल्यावर मला ते सगळे आठवते जेव्हा मी तयार होऊन वेगवेगळ्या ठिकाणी जायची." सध्या स्वराचा हा व्हिडिओ सोशल मिडियावर खुप व्हायरल होत आहे. स्वराचे चाहते तिच्या या व्हिडिओवर खूप कमेंट करत आहेत. स्वरा भास्कर - फहाद यांनी लग्न केल्यानंतर 23 सप्टेंबर 2023 रोजी आपल्या पहिल्या मुलीचे स्वागत केले. स्वराने तिच्या लेकीचे नाव राबिया ठेवले आहे.

## आला नवा 'सेक्सीएस्ट मॅन'!

जगातील सर्वात सुंदर स्त्री कोण, सर्वात प्रभावी व्यक्तिमत्वाचा पुरुष कोण याविषयी नेहमीच अनेकांना कुतूहल असते. या व्यक्ती काय करतात, कशाप्रकारे आपल्या दैनंदिन जीवनाचा आनंद घेतात याविषयी चाहत्यांना जाणून घ्यायला आवडते. आता पिपल मॅगझीनच्यावतीनं एक नवी यादी समोर आली आहे. पिपल्स मॅगझीननं जगातील सर्वात सेक्सिएस्ट मॅन अलाईव्ह २०२३ ची यादी प्रकाशित केली आहे. यंदाच्या त्या यादीत कॅप्टन अमेरिका फेम ख्रिन्स इवान्सला मागे टाकले आहे. त्या व्यक्तीचे नाव पॅट्रिक डेम्पसी असे असून त्याचे वय ५७ वर्षांचे आहे. गेल्या काही दिवसांपासून पॅट्रिकच्या नावाची मोठ्या प्रमाणात चर्चा होताना दिसत होती. आता त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले आहे. या पुरस्कार मिळाल्यानंतर त्यांची प्रतिक्रिया देखील समोर आली आहे. आता आपण पॅट्रिक डेम्पसी यांच्याविषयी जाणून घेणार आहोत. अमेरिकन अभिनेता आणि कार रेसिंग ड्रायव्हर म्हणून पॅट्रिक यांची ओळख आहे. ५७ वर्षांच्या पॅट्रिक यांची ओळख मोठी आहे. यापूर्वी देखील त्यांनी आपली वेगळी छाप उमटवली आहे. त्यांची प्रतिक्रिया देखील समोर आली आहे.

## मंदान्नाचा डीपफेक व्हिडिओ



सध्या साउथ अभिनेत्री रश्मिका मंदान्ना ही एका व्हायरल व्हिडिओमुळे चर्चेत आली आहे. रश्मिका मंदान्नाचा डीपफेक व्हिडिओ व्हायरल झाला. ज्यात एका दुसऱ्या मुलीच्या चेहऱ्यावर रश्मिकाचा चेहरा लावून तो व्हायरल करण्यात आला होता. हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर अनेक कलाकार आणि रश्मिकाचे चाहते तिच्या सपोर्टसाठी समोर आले. अमिताभ बच्चन पासून ते मृणाल ठाकुर पर्यंत अनेकांनी या प्रकरणी कडक कारवाई करण्याची मागणी केली. आता या प्रकरणावर साउथ स्टार विजय देवरकोंडाने देखील रश्मिकाच्या व्हायरल व्हिडिओवर प्रतिक्रिया दिली आहे. रश्मिका आणि विजयच्या रिलेशनशीपच्या चर्चा गेल्या अनेक दिवसांपासून होत आहेत. अशातच सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करत विजयने या सर्व प्रकरणावर संताप व्यक्त केला आहे. विजय देवराकोंडाने त्याच्या इंस्टाग्राम स्टोरीवर एक पोस्ट शेअर केली आहे. ज्यात रश्मिकाच्या डीपफेक व्हिडिओवर सरकारने कारवाई केल्याची आल्याची बातमी दिली आहे. ही पोस्ट शेअर करताना विजयने लिहिले, "भविष्यासाठी हे खूप महत्त्वाचे पाऊल आहे. हे कोणाच्याही बाबतीत होऊ नये. यासोबतच अशा घटना तात्काळ थांबवून गुन्हेगारांना शिक्षा व्हावी यासाठी सक्षम सायबर विंग बनवण्यात यावी." सध्या विजयची पोस्ट सोशल मिडियावर खुप चर्चेत आहे. त्याने रश्मिकासाठी पोस्ट केल्यानं नेटकरी त्याचे कौतुक करत आहेत. विजय देवराकोंडा सोशल मीडियावर खूप सक्रिय आहे. तो अनेकदा फोटो आणि व्हिडिओ शेअर करतो. अनेक दिवसांपासून रश्मिका आणि विजय एकमेकांना डेट करत असल्याच्या चर्चा होत आहेत. दोघेही बऱ्याचदा एकत्र दिसले आहेत. त्याचे व्हिडिओदेखील व्हायरल होत असतात. प्रसिद्ध अभिनेत्री रश्मिका मंदाना ही सध्या तिच्या एका व्हिडिओमुळे चर्चेत आली आहे. रश्मिकाचा एक व्हिडिओ सोशल मिडियावर व्हायरल झाला होत आहे. या क्लिपमधील मुलगी काळ्या रंगाच्या डीप नेक टाइट जिम वेअरमध्ये लिफ्टच्या आत आल्याचे दिसत आहे. रश्मिकाचा हा बोल्ड व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होताच चाहते संतापले आहेत. त्यानंतर अनेकांनी सोशल मिडियावर या व्हिडिओवर प्रतिक्रिया देणं सुरु केले. मात्र ही अभिनेत्री रश्मिका नव्हे तर झारा पटेल आहे. रश्मिका मंदान्नाचा हा डीपफेक व्हिडिओ व्हायरल झाल्याने अमिताभ बच्चन देखीलही संतापले आहेत.

## जुनैद साकारतोय तृतीयपंथीयाची भूमिका

प्रसिद्ध अभिनेता आमिर खानचा मुलगा जुनैद खान हा एका वेगळ्या कारणासाठी चर्चेत आला आहे. जुनैद हा आता बॉलीवूडचा भाग होणार असून तो लवकरच बॉलीवूडमध्ये इंट्री करणार असल्याचे बोलले जात आहे. काही दिवसांपूर्वी आमिर खाननं त्याच्या डेब्यू विषयी सांगितलं होतं. त्यानं एका मुलाखतीतून याबाबत खुलासा केला होता. आमिर खान हा जसा त्याच्या वेगवेगळ्या भूमिकांसाठी ओळखला जातो तसा त्याचा मुलगा देखील त्याच्या पहिल्याच भूमिकेमुळे चर्चेत आला आहे. नाट्यविश्वात मनसोक्त मुशाफिरी करणाऱ्या जुनैदनं आता ट्रान्सवुमनची भूमिका साकारत डेब्यू करण्याचा निर्णय घेतला आहे. यानंतर जुनैदच्या नावाची चर्चा सुरु झाली आहे. अमर उजालानं याविषयी अधिक माहिती देणारं वृत्त प्रकाशित केलं आहे. जुनैद हा देखील त्याच्या वडिलांच्या मार्गानं वाटचाल करत असल्याच्या प्रतिक्रियांना उधाण आले आहे. आमिरनं त्याच्या आतापर्यंतच्या करिअरमध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या भूमिका केल्या आहेत. त्याला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसादही मिळाला आहे.

## सारा तेंडुलकरच्या फोटोसोबत छेडछाड!



बॉलिवूड अभिनेत्रींच्या फोटो आणि व्हिडिओसोबत छेडछाड केल्याच्या अनेक घटना समोर येत आहे. अभिनेत्रींच्या फोटो आणि व्हिडीओला फोटोशॉप्ड, मोर्फ आणि डीपफेकद्वारे छेडछाड केली जाते. अभिनेत्री रश्मिका मंदाना हिचा नुकताच डीपफेक व्हिडीओ व्हायरल झाला होता. त्या व्हिडीओनंतर अभिनेत्यांकडून नाराजी व्यक्त करण्यात आली होती. आता सचिन तेंडुलकरची मुलगी सारा हिच्या फोटोसोबत छेडछाड करण्यात आली आहे. सारा तेंडुलकर आणि शुभमन गिल यांचा फोटो व्हायरल झालाय. सारा तेंडुलकरने इन्स्टाग्रामवर पोस्ट केलेल्या एका फोटोला फोटोशॉप्ड करण्यात आलेय. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या फोटोमध्ये, सारा तेंडुलकर तिचा रूमर्ड बॉयफ्रेंड शुभमन गिलच्या गळ्यात हात घालून दिसत आहे. हा फोटो धोनी पोपा नावाच्या युजरने सोशल मीडियावर शेअर केला आहे. त्याने कॅप्शन लिहिले आहे - 'साराने शुभमन गिलला डेट करत असल्याचे कन्फर्म केलेय'. या पोस्टनंतर साराचा फोटो सोशल मीडियावर वाऱ्यासारखा व्हायरल झालाय. मात्र, याच फोटोवर आणखी एका युजरने कमेंट करून सत्य उघड केले आहे. युजरने साराचा खरा फोटो शेअर करत हा फोटो फेक असल्याचे म्हटले आहे. सारा शुभमन गिलसोबत नाही तर तिचा भाऊ अर्जुन तेंडुलकरसोबत दिसत आहे. सारा तेंडुलकरने आपल्या इन्स्टाग्रामवर भाऊ अर्जुन तेंडुलकरसोबत फोटो पोस्ट केला होता.

# इंग्लंडचा 160 धावांनी विजय!

## गतविजेते सातव्या स्थानी; नेदरलँड स्पर्धेबाहेर

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**विश्वचषक 2023 मध्ये गतविजेत्या इंग्लंडने आपल्या शेवटच्या साखळी सामन्यात बुधवारी नेदरलँडवर 160 धावांनी शानदार विजय मिळवला. या विजयासह इंग्लंडच्या खात्यात दोन गुण जमा झाले. या विजयामुळे गुणतालिकेत इंग्लंड दहाव्या स्थानावरून सातव्या स्थानावर पोहोचला आहे. दुसरीकडे, नेदरलँडचा संघ आठ सामन्यांतील सहाव्या पराभवासह विश्वचषकातून बाहेर पडला आहे.**




इंग्लंडचा कर्णधार जोस बटलरने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यावर संघाने 50 षटकांत 9 बाद 339 धावा केल्या. प्रत्युत्तरात नेदरलँडचा संघ 37.2 षटकांत 179 धावांवर गारद झाला. या पराभवासह विश्वचषकातून बाहेर पडणारा हा चौथा संघ ठरला आहे. नेदरलँडकडून तेजा निदामनुरूने सर्वाधिक नाबाद 41 धावा केल्या. कर्णधार स्कॉट एडवर्डसने 38 आणि वेस्ली बॅरेसीने 37 धावा केल्या. इंग्लंडकडून मोईन अली आणि आदिल रशीदने प्रत्येकी तीन बळी घेतले. डेव्हिड विलीने दोन गडी टिपले. तत्पूर्वी, अनुभवी फलंदाज बेन स्टोक्सने इंग्लंडकडून 108 धावा केल्या. त्याने 84 चेंडूंच्या खेळीत सहा चौकार आणि सहा षटकार मारले. आयसीसी एकदिवसीय विश्वचषक २०२३ स्पर्धेतील ४०वा सामना बुधवारी पुण्यातील एमसीए स्टेडियमवर पार पडला. या सामन्यात इंग्लंड आणि नेदरलँड्स आमनसामने आले होते. इंग्लंडने या सामन्यात नेदरलँड्सचा १६० धावांनी पराभव केला. इंग्लंडचा कर्णधार जोस बटलरने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. इंग्लंडने ५० षटकांत ९ बाद ३३९ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात नेदरलँड्सचा संघ ३७.२ षटकांत १७९ धावांवर गारद झाला. या पराभवासह विश्वचषकातून बाहेर पडणारा हा चौथा संघ ठरला आहे. इंग्लंड संघाने आपल्या शेवटच्या साखळी सामन्यात शानदार विजय संपादन केला. त्यांनी नेदरलँडचा १६० धावांनी पराभव केला. या विजयासह इंग्लंडच्या खात्यात दोन गुण जमा झाले. आठ सामन्यांत त्याचे चार गुण झाले आहेत. इंग्लंडला सहा सामन्यांत पराभवाचा सामना करावा लागला आहे. गुणतालिकेत इंग्लंड दहाव्या स्थानावरून सातव्या स्थानावर पोहोचला आहे. दुसरीकडे, नेदरलँडचा संघ आठ सामन्यांतील सहाव्या पराभवासह विश्वचषकातून बाहेर पडला आहे. त्याचबरोब बेन स्टोक्स प्लेअर ऑफ द मॅचचा मानकरी ठरला. नेदरलँड्सकडून तेजा निदामनुरूने सर्वाधिक नाबाद ४१ धावा केल्या. कर्णधार स्कॉट एडवर्ड्सने ३८ आणि वेस्ली बॅरेसीने ३७ धावा केल्या. सायब्रँडने ३३ आणि बास डी लीडेने १० धावा केल्या. इंग्लंडकडून मोईन अली आणि आदिल रशीदने प्रत्येकी तीन विकेट्स घेतल्या. त्याचबरोबर डेव्हिड विलीने दोन आणि ख्रिस वोक्सने एक विकेट घेतली. तत्पूर्वी, अनुभवी फलंदाज बेन स्टोक्सने इंग्लंडकडून १०८ धावा केल्या. त्याने ८४ चेंडूंच्या खेळीत ६ चौकार आणि ६ षटकार मारले.

### इंग्लंडच्या खात्यात दोन गुण जमा

» नेदरलँड्सकडून तेजा निदामनुरूने सर्वाधिक नाबाद ४१ धावा केल्या. कर्णधार स्कॉट एडवर्ड्सने ३८ आणि वेस्ली बॅरेसीने ३७ धावा केल्या. सायब्रँडने ३३ आणि बास डी लीडेने १० धावा केल्या. इंग्लंडकडून मोईन अली आणि आदिल रशीदने प्रत्येकी तीन विकेट्स घेतल्या. त्याचबरोबर डेव्हिड विलीने दोन आणि ख्रिस वोक्सने एक विकेट घेतली. इंग्लंड संघाने आपल्या शेवटच्या साखळी सामन्यात शानदार विजय संपादन केला. त्यांनी नेदरलँडचा १६० धावांनी पराभव केला. या विजयासह इंग्लंडच्या खात्यात दोन गुण जमा झाले. आठ सामन्यांत त्याचे चार गुण झाले आहेत. इंग्लंडला सहा सामन्यांत पराभवाचा सामना करावा लागला आहे. गुणतालिकेत इंग्लंड दहाव्या स्थानावरून सातव्या स्थानावर पोहोचला आहे.

# पराभवामुळे उपांत्य फेरीचा मार्ग कठीण?

## मॅक्सवेलला बाद करण्याची वाट पाहत राहिले

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**अफगाणिस्तानचे मुख्य प्रशिक्षक जोनाथन ट्रॉट यांनी मंगळवारी (७ नोव्हेंबर) मुंबईत झालेल्या आयसीसी विश्वचषक सामन्यात, ऑस्ट्रेलियाला विजय मिळवून देणाऱ्या ग्लेन मॅक्सवेलला अफगाण क्षेत्ररक्षकांनी झेल सोडत संधी दिल्याबद्दल निराशा व्यक्त केली आहे. अफगाणिस्तानने पहिल्या खेळात २९१ धावा केल्या. सामन्यात एकवेळ अशी होती की, ऑस्ट्रेलियाची धावसंख्या ९१/७ बिकट झाली होती.**



परंतु, मॅक्सवेलला २२व्या षटकात ३३ धावांवर जीवदान मिळाले आणि त्यानंतर त्याने २०१ धावांची नाबाद खेळी खेळली आणि अफगाणिस्तानच्या हातातोंडाशी आलेला सामना हिरावून घेतला. “मॅक्सवेलसारख्या खेळाडूला चारवेळा जीवदान देणे म्हणजे सामना गमावणे आहे,” असे ट्रॉट म्हणाला. अफगाणिस्तानच्या पराभवानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना ट्रॉट म्हणाला, “आम्ही ज्या परिस्थितीत होतो त्याचा फायदा उठवायला हवा होता. संघाने चार झेल सोडले होते आणि मॅक्सवेलसारख्या खेळाडूला संधी देणे म्हणजे सामना गमावणे. त्याचा फायदा घेत त्याने मोकळा श्वास घेत मोठे फटके खेळण्यास सुरुवात केली. अफगाणी गोलंदाजांनी त्याला स्वातंत्र्य दिले आणि त्याने मुक्तपणे चौकार-षटकार मारले. त्यानंतर हा सामना ऑस्ट्रेलियाकडे वळवला. ही एक अविश्वसनीय अशा स्वरूपाची जागतिक दर्जाची खेळी होती. पण अर्थातच आम्हीही त्याला यात मदत केली.” मॅक्सवेलची खेळी जसजशी पुढे सरकत गेली तसतसे त्याचे आणि कमिन्सचे मनोबल वाढले आणि अफगाणी खेळाडूंचे कमी झाले,” असे ट्रॉटने सांगितले. तो पुढे म्हणाला की, “मॅक्सवेलने एका अननुभवी संघाला जागतिक दर्जाचा संघ आणि जागतिक दर्जाच्या खेळाडूंविरुद्ध कधीही हार न मानण्याचा धडा आहे.” ट्रॉट पुढे म्हणाला, “तुम्ही कोणत्याही जागतिक दर्जाच्या खेळाडूचे चार झेल सोडता तेव्हा तो तुमचे नुकसान करणाच. तुमचे क्षेत्ररक्षण सतत सुधारत राहणे ही काळाची गरज आहे. हे न झाल्यामुळे आज आम्हाला महत्त्वाचा सामना गमवावा लागला. त्यामुळे ही एक छोटी गोष्ट आहे ज्यातून प्रत्येकजण शिकू शकतो.” प्रशिक्षक जोनाथन पुढे म्हणाला, “दुर्दैवाने जेव्हा दुसरा झेल सोडला तेव्हा सर्वजण मॅक्सवेलच्या आऊट होण्याची वाट पाहत होते. मला फारसा उत्साह किंवा खेळाडू एकमेकांना प्रोत्साहन देताना दिसले नाहीत. त्यावेळी मानसिकता थोडीशी अशी झाली होती की, ‘ठीक आहे.

# विराट कोहलीची सराव सत्राला दांडी!

नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

क्रिकेट विश्वचषक २०२३च्या मोठ्या उपांत्य फेरीपूर्वी, उत्साही टीम इंडिया आपल्या शेवटच्या लीग सामन्याची तयारी करत आहे. आठ सामन्यांतून आठ विजयांसह, ‘मेन इन ब्लू’ सर्व लीग सामने जिंकत गुणतालिकेत अव्वल स्थानी आहे. नेदरलँड्सविरुद्धच्या सामन्यासाठी भारतीय संघाने आतापासूनच तयारी सुरू केली आहे. हा सामना १२ नोव्हेंबरला बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर होणार आहे. सराव सत्रात शुबमन गिल आणि इतर खेळाडू नेटमध्ये जोरदार सराव करताना दिसले, मात्र स्टार फलंदाज विराट कोहली या सत्रात सहभागी झाला नाही. भारत विरुद्ध नेदरलँड्स सामना उच्च स्कोअरिंग असण्याची अपेक्षा आहे आणि बुधवारी वैकल्पिक प्रशिक्षण सत्रादरम्यान शुबमन गिल आणि के.एल. राहुलसह खेळाडू नेटमध्ये मोठे शॉट मारताना दिसले. भारताने आतापर्यंत आठ सामने खेळले असून, या सर्व सामन्यांमध्ये संघाने विजय मिळवला आहे. नुकत्याच नवीन आयसीसी क्रमवारी जाहीर झाली असून त्यात शुबमन गिलने बाबर आझमला मागे टाकत अव्वल स्थान पटकावले आहे. त्याचाच परिणाम सराव सत्रात दिसून आला. त्याने नेट बॉलर्सवर हल्लाबोल करत दमदार षटकार मारले. २४ वर्षीय खेळाडू अजूनही विश्वचषकातील आपल्या पहिल्या शतकाच्या शोधात आहे. भारतीय सलामीवीराने या स्पर्धेत आतापर्यंत सहा डावांत २१९ धावा केल्या आहेत, ज्यात श्रीलंकेविरुद्धच्या 92 धावांचा समावेश आहे. शुबमन गिल, के.एल. राहुल आणि इतरांनी नेटमध्ये कठोर परिश्रम केले.